शुक्रवार दिनांक १८/०९/२०१५ रोजी सकाळी ०१.०० वाजता बांधकाम समिती सभागृह जि.प.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
|---|---|---|
| शुक्रवार दिनांक | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| १८/०९/२०१५ रोजी | २) मा.श्री.भोसले राजू अनिल | सदस्य |
| दुपारी १.०० वाजता | ३) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ४) मा.श्री.कदम राहूल बबनराव | सदस्य |
| | ५) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ६) मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत | सदस्य |
| | ७) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ८) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |
| | ९) मा.श्री.जयवंत दिनकर जगताप | सदस्य |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्रं.१ :- दिनांक २१.०८.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.२०६ :- दिनांक २१.०८.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.जाधव सदाशिव यशवंत
अनुमोदकः- मा.सौ.राधाताई दिनकर शिंदे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. २०७ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या.

सूचक :- मा.श्री.कदम राहुल बबनराव
अनुमोदक :- मा.सौ.सुरेखा महेंद्र पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३ :-सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ अंतर्गत कोडोली एम आ डी सी ते जनाई मळाई पायथा रस्ता इजिमा ४१ सुधारणा करणे ता.सातारा र.रु.२५,००,०००/- अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्रं.२०८ :- सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ ३०५४ ग्रामीण मार्ग विकास व मजबुतीकरण अंतर्गत जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती सातारा यांचेकडून सन २०१५-१६ मध्ये जिल्हा परिषदेकडे निधी वितरीत करणेत येणार आहे. तत्पुर्वी प्रशासकिय मंजूर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे कोडोली एम.आय. डी.सी.ते जनाई मळाई पायथा रस्ता इजिमा ४१ सुधारणा करणे ता सातारा रक्कम रुपये २५,००,०००/- चे कामास महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे सुधारीत शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ दिनांक ३१ जानेवारी २०१३ अन्वये ही सभा प्रशासकिय मंजूर देत आहे.

सूचक :- मा.श्री.भोसले राजु अनिल
अनुमोदक :- मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत

**ठराव सर्वानुमते मंजुर**

ऐ.विषय क्रं.४:- इजिमा ६० अंबवडे बु शिंदेवाडी मस्करवाडी लावघर अनावळे ते प्रजिमा ३७ रस्ता इजिमा ५७ सुधारणा करणे ता सातारा सा क्र. ०/००० ते १/००० या कामाची निविदा स्वीकृतीस मंजुरी देणे बाबत विचार करणे.

ठराव क्रं.२०९ :-१३ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत रस्ते दुरुस्ती ३०५४ लेखाशिर्षाखाली इजिमा ६० अंबवडे बु शिंदेवाडी मस्करवाडी लावघर अनावळे ते प्रजिमा ३७ रस्ता इजिमा ५७ सुधारणा करणे ता सातारा सा क्र ०/००० ते १/००० ता.सातारा र.रु. २८.०० प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता २४,९४,४१८/- ची निविदा या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ११/८/२०१५ ते २५/८/२०१५ या कालावधीत पहिली वेळ प्रसिध्द करणेत आली होती. सदर कामाचा दराचा दुसरा लखोटा ५/९/२०१५ रोजी उघडला असता एच.पी.पाढरे कन्ट्रक्शन यांची निविदा ही निविदा रकमेपेक्षा ४.०० टक्के जादा दराने भरली होती सदर मक्तेदारास दिनांक ५/९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दराच्या तडजोडी बाबत कळविले असता संबधीत मक्तेदाराने दिनांक ७/९/२०१५ रोजी च्या पत्रान्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.८५ टक्के जादा दराने काम करणेस तयार असले बाबत कळविले आहे. सन २०१४-१५ चे दरसुचीनुसार ३.८५ टक्के जादा दरानुसार एकूण रक्कम रुपये २५,९०,४५३/- होत आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.क्र.झेडपीए २०१२/प्रक्र/६८०/वित्त ९ मंत्रालय मुंबई दिनांक ३१ जानेवारी २०१३ अन्वये रक्कम रुपये २३,००,००१/- ते ३०,००,०००/- पर्यंतचे कामाच्या निविदा स्विकृतीचे अधिकार विषय समिती जिल्हा परिषद यांना आहेत. विषय समिती जि.प.सातारा यांना असल्याने सदरची निविदा मंजुरीसाठी बांधकाम समितीपुढे सादर केलेली आहे.

सूचक :- मा.श्री.भोसले राजु अनिल
अनुमोदक :- मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत

**ठराव सर्वानुमते मंजुर**

ऐ.वे.विषय क्रं.५ः- देगांव कळंबे रस्त्या बाबत.

ठराव क्रं.२१०ः- शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी केंद्र शासनाने सातारा मेगा फुड पार्क हा प्रकल्प सातारा येथे मंजुर केला आहे. या प्रकल्पामुळे अंदाजे तीन हजार लोकांना रोजगार मिळणार असून सूमारे दहा हजार शेतक-यांना त्याचा लाभ होईल व त्यामुळे लक्षावधी रुपयाचे शेतमालाचे मुल्यावर्धन होणार आहे. सदर प्रकल्पासाठी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वळसे गावापासूनचा रस्ता ग्रामा २०७ (२.२५कि.मी.) हा २००१-२०२१ जि.प.आराखडयामध्ये समाविष्ट आहे.सदर रस्त्यासाठी जिल्हा उयोग केंद्र सातारा मार्फत सातारा फुड पार्क लि.राज्य शासनाच्या उदयोग विभागाकडून निधी उपलब्ध करुन घेणार आहेत.त्यासाठी प्रधान सचिव (उदयोग) यांची तत्वतः मान्यता मिळाली आहे. हा निधी औदयोगिक पायाभूत सुविधासाठी निर्मिती व विकास या २५ फेब्रुवारी २०१३ च्या शासन निर्णया नुसार मिळेल. याकामी सा.बां.विभाग सातारा यांनी अंदाजपत्रक तयार केले आहे. तरी हा रस्ता जि.प. सातारा यांच्या अखत्यारीत असल्याने मान्यता देता येत नाही. तरी सा.बा. विभाग सातारा यांचे अंदाजपत्रक आधार धरुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.सदर रस्ता पुर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती जि.प.मार्फत करण्यात येईल.

सदर प्रकल्प हा सातारा आणि आसपासच्या जिल्हयासाठी वरदान ठरणार असून त्यासाठी जिल्हा परिषद सातारा बांधकाम विभागाकडुन जे काही सहकार्य प्रशासकीय तांत्रिक मंजुरी लागतील त्या तत्परतेने उपलब्ध करण्यात येतील. सदर रस्ता २.२५ कि.मी.असून त्यापैकी १ कि.मी.अंतर वनविभागातून जात आहे. वनखात्याने ७.५ मी.रुंदीची मान्यता यापूर्वी दिलेली असल्याने सुधारित लांबीने व ९ मीटर रुंदीने वन खात्याची परवानगी मिळणे करिता तात्काळ वनविभागास प्रस्ताव सादर करावा या बाबीस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत
अनुमोदक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र

ठराव सर्वानुमते मंजुर

येणेप्रमाणे विचार विनिमय झालेनंतर मा.जि.प.सदस्य,श्री.जाधव सदाशिव यशवंत यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपलेचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| **सही/XXX** | **सही/XXX** |
| **सचिव** | **सभापती** |
| **बांधकाम समिती जि.प.सातारा** | **बांधकाम समिती जि.प.सातारा** |